ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 55,
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ३० एप्रिल, १९५२ | अंक १८

## विविध माहिती

**रशिआंतील भारतीय पाहुणे**—मॉस्को आर्थिक परिषदेला गेलेलें हिंदी प्रतिनिधी मंडळ लेनिनग्रॅडला भेट देऊन पुन्हा मॉस्कोला परत आलें. आतां हें प्रतिनिधी मंडळ मध्य-आशिआतील उझबेकिस्तान उपराज्याच्या दौऱ्यावर गेलें आहे. त्यांच्या प्रवासाचा खर्च सोव्हिएट चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें केला.

**जेट विमानांची ये-जा**—बी. ओ. ए. सी. ही विमान कंपनी पुढील महिन्यापासून भारत आणि सिंगापूर ह्यांकडे जाण्यासाठीं कॉमेट जातीचीं जेट विमानें वापरणार आहे. ऑगस्ट महिन्यांत लंडन ते सिंगापूर ही सर्व्हिस सुरू होणार आहे. त्याची पूर्व तयारी म्हणून वरील उपक्रम चालू करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत भांडवल पुढें येत नाहीं**—पाकिस्तान कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीजच्या तिसऱ्या अधिवेशनांत भाषण करतांना पाकिस्तानचे मुख्य प्रधान म्हणाले कीं देशांतील भांडवल पुढें येत नसल्यामुळें पाकिस्तानची औद्योगिक प्रगति अडखळ होऊन बसली आहे.

**गौरीशंकर शिखरावर रशिअन स्वारी**— हिमालयांतील गौरीशंकर ह्या अत्युच्च, शिखरावर आरोहण करण्यासाठी रशिआची एक तुकडी निघणार आहे. ह्या तुकडींत फक्त १५० लोकांनाच घेण्यांत येणार आहे, परंतु हजारों रशिअन गिर्यारोहक कॉकेशस व पामीर पर्वतांत खास शिक्षण घेत आहेत. त्यांच्यांतूनच १५० जणांची निवड करण्यांत येणार आहे.

**तेलाच्या घाण्यासाठी बक्षीस**—खेड्यांत वापरता येण्यास सोयीस्कर असा तेलाचा घाणा तयार करण्यासाठीं इंडियन सेंट्रल ऑइल सीड्स कमिटीनें २,००० रुपयांचें बक्षीस जाहीर केलें आहे. यंत्र तयार करणारांना तें चालवून दाखवावें लागेल. स्पर्धकांनीं ३१ ऑगस्ट, १९५२ पर्यंत आपले घाणे पाठवावयाचे आहेत.

**पाकिस्तानला रशिआचें पोलाद**—मॉस्को येथें नुकत्याच भरलेल्या आर्थिक परिषदेचे वेळीं पाकिस्ताननें रशिआकडून १,००,००० टन पोलाद विकत घेतल्याचें समजतें. पोलादाचा पुरवठा रशिआ तात्बडतोब करणार आहे. ब्रिटननेंहि रशिआकडून पोलाद घ्यावें अशी सूचना एका मजूरपक्षीय सभासदानें केली.

**पेप्सूंत सक्तीचें प्राथमिक शिक्षण**— पतियाळा आणि पूर्व-पंजाब राज्यांत प्राथमिक शिक्षण लवकरच सक्तीचें करण्यांत येणार असल्याचें समजतें. पांच वर्षांत राज्यांतील निरक्षरतेचें पूर्णपणें उच्चाटन करण्याचा राज्यसरकारचा मनोदय आहे.

**परदेशस्थ राज्य-प्रतिनिधी**—भारताचे जे राजनैतिक प्रतिनिधी परदेशांत कामावर असतात, त्यांच्या पगारावर प्राप्तीवरील कराची आकारणी करण्यांत येत नसे. परंतु आतां नव्या पार्लमेंटच्या पहिल्या अधिवेशनांत तशी तरतूद करण्यासंबंधीं प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे असें समजतें. अमेरिका व ब्रिटन हीं राष्ट्रें आपल्या राजनैतिक प्रतिनिधींकडून प्राप्तीवरील कर घेतात.

**२० शेर दूध देणारी गाय**—बेळगांव येथील एक नागरिक श्री. कपडेकर ह्यांच्या जवळ इंग्लिश बैल आणि सिंधी गाय ह्यांच्या पैदाशीची एक गाय आहे. गायीचें वय ३ वर्षे, २ महिन्यांचें आहे. ती दुसऱ्यांदा विल्यावर आतां दररोज ४० पौंड दूध देत आहे, असें समजतें.

**अपघातांत मृत्यू अधिक**— चालू शतकांत अमेरिकेंत रस्त्यावरील अपघातांत सांपडून मेलेल्यांची संख्या १०,१२,००० इतकी आहे! १७७ वर्षांपूर्वीं ब्रिटन-विरोधी लढाई झाली होती तेव्हांपासून आतांपर्यंत लढाईंत मृत्यू पावलेल्या अमेरिकन सैनिकांची संख्या १०,५०,००० इतकी आहे.

**हैदराबाद राज्यांतील पोस्टें**— हैदराबाद संस्थानांतील दोन हजार लोकवस्ती असणाऱ्या प्रत्येक खेड्यांत पोस्ट ऑफिस आहे, असें सरकारी रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. संस्थानांत ३१ मार्च रोजीं संपलेल्या वर्षांत ४६३ ब्रँच पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं.

**सिंधू नदीच्या पाण्याचा उपयोग**— सिंधू नदीच्या पाण्याचा उपयोग करून घेण्यासाठीं एक तज्ज्ञांची समिति नेमली जाणार आहे असें समजतें. ह्या समितीवर भारत, पाकिस्तान आणि जागतिक बँक ह्यांचे प्रतिनिधी असतील. समिति वॉशिंग्टनला १७ मेला भरेल, असा अंदाज आहे.

**जगाची लोकसंख्या**— संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या आंकडेखात्यानें जगाच्या लोकसंख्येचा अंदाज २४० कोटी इतका केला आहे. त्यापैकीं निम्मी लोकसंख्या आशियांत आहे. खंडवारी लोकसंख्या पुढीलप्रमाणें आहे:— आफ्रिका १९·९ कोटी, उत्तर अमेरिका २१·६ कोटी, द. अमेरिका ११·१ कोटी, रशिआ वगळून आशिआ १२७·२ कोटी, रशिआ वगळून युरोप ३९·६ कोटी, ओशिआना १·३ कोटी आणि सो. रशिआ १९·३ कोटी.

**फोर्ड फौंडेशन**—जगांतील अतिशय श्रीमान अशा ह्या ट्रस्टच्या निधींत १९५१ सालीं ९९,००,००० डॉलर्सची भर पडली.

## पुणें जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांची परिषद्

**रजिस्ट्रार, श्री. चिन्मुळगुंद, ह्यांचें मार्गदर्शन**

पुणें जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांची परिषद् ता. १८ व १९ एप्रिल, १९५२ रोजीं पुणें सेंट्रल को. बँकेच्या सभागृहामध्यें श्री. व्ही. डी. कारखानीस, बी. ए. (ऑ.), जी. डी. सी. ए., डेप्युटी रजिस्ट्रार को. सो. पुणें विभाग, पुणें यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडली. परिषदेचें उद्‌घाटन श्री. पी. जे. चिन्मुळगुंद, आय. सी. एस., रजिस्ट्रार को. सो. मुंबई राज्य, यांचे हस्तें ता १८ रोजीं दुपारीं ३ वाजतां झालें. सभेला सरकारी अधिकारी, तालुका व जिल्हा ऑनररी ऑर्गनायझर्स, पुणें सेंट्रल को. बँकेचे अधिकारी, जिल्हा खरेदी व विक्री संघ, जिल्हा सहकारी बोर्ड, वगैरे संस्थांचे अधिकारी व इतर कार्यकर्ते मिळून सुमारें १५० मंडळी हजर होती.

मे. रजिस्ट्रार साहेब यांचें सभेला उद्देशून खालील आशयाचें भाषण झालें.—

" हल्लीं सोसायट्यांमध्यें वाढत्या प्रमाणांत अपहार होत आहे ही गोष्ट सोसायट्यांना व त्यामुळें सहकारी चळवळीला धोकादायक आहे. पंच–कमिटी या बाबतींत जबाबदार असून त्यांनीं आपली जबाबदारी ओळखून काम केलें पाहिजे. त्याचप्रमाणें सोसायटीनें नवीन वाटप काम हातीं घेण्यापूर्वी आपल्या पोटनियमाप्रमाणें एक वर्ष तरी चांगलें काम केलें पाहिजे. तसेंच कंझ्युमर्स सोसायटीनें स्वतःचें भांडवल ५,००० रु. असेल तरच हें काम हातीं घ्यावें. सोसायटीच्या सभासदानें खरेदीविक्री संस्थेमार्फत आपल्या मालाची विक्री करावी असा पोटनियमही आहे. पण त्याची अंमलबजावणी होत नाहीं. गुजरात व कर्नाटकांत गेल्या १०–१२ वर्षांपासून कापूस–विक्री सहकारी संस्थामार्फतच होत आहे. त्याप्रमाणें आपणांकडे व्यवस्था व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणें, वेअरहाऊस कायद्याप्रमाणें फक्त कोल्हापूरच्या दोनच संस्थांनीं फायदा घेतला आहे तरी याही बाबतींत अनेक सोसायट्यांना फायदा घेतां येईल. " शेवटीं कमालमर्यादा पत्रक व ग्रेन बँका यांचेबद्दल माहिती सांगून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. त्यानंतर चेअरमन श्री. जे. टी. सावंत व श्री. वाय. डी. ओगले यांनीं आभार मानले व तीन विषयांवर चर्चा होऊन त्या दिवसाचें काम संपलें.

### घोटी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें उद्‌घाटन

नाशिक जिल्ह्यांतील इगतपुरी तालुक्यांत घोटी येथें खरेदी-विक्रीसंघाचे ऑफिसांत ता. २१–४–५२ रोजीं दुपारीं २ वाजतां प्राध्यापक श्री. गो. पुराणिक, नाशिक यांचे हस्तें सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें उद्‌घाटन करण्यांत आलें. त्यावेळीं श्री. पाटील व्हा. चेअरमन, श्री. परदेशी, श्री. बल्लाळ बँक इन्स्पेक्टर, श्री. कुलकर्णी सेक्रेटरी टी. डी., श्री. ए. श्री. गोंदेगांवकर मॅनेजर खरेदीविक्री संघ सुपरवायझर व को. ट्रे. इन्स्पेक्टर व इतर निमंत्रित व उमेदवार मिळून एकूण ७५ वर मंडळी हजर होती. श्री. एन. वाय. कुलकर्णी यांनीं क्लासबाबत प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रो. पुराणिक, अध्यक्षांनीं सेक्रेटरींचें शिक्षण व सहकारी हिशोबाची माहितीसंबंधीं समयोचित भाषण करून सहकारितेचा उगम कसा झाला हें सांगून हल्लींच्या चालू परिस्थितींत सर्व जनतेस आर्थिक दृष्ट्या वाढ होण्यास एकच मार्ग जो आहे तो म्हणजे सहकारच आहे व त्यानेंच सर्वतोपरी उन्नति घडवून येईल असें सुचविलें. यानंतर आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला.

### म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि.

वरील कंपनीचा कारखाना १९५१ मध्यें ११½ महिने चालू होता, आणि त्यानें ६,७८,००० रुपये किंमतीचें ४०९ टन काचसामान तयार केलें. १९५० मध्यें ६,९३,००० रु. किंमतीचें ५८० टन काचसामान तयार झालें होतें. म्हणजे, १९५० चे मानानें १९५१ मध्यें १७१ टन कमी मालाचें उत्पादन झालें. कारखान्यांतील कामगारांच्या निष्काळजीपणामुळें फूटतूट व नुकसानी वाढली आहे, ती त्यांच्या व सरकारच्या मजूर–विषयक खात्याच्या नजरेस आणण्यांत आली आहे. उत्पादन कमी झालें, तरी विक्रीस किंमत जास्त आली. परंतु, मंदीमुळें ही परिस्थिति टिकणारी नाहीं. कंपनीचे मॅनेजिंग एजंट, श्री. शंकरराव ओगले, हे ग्रेट ब्रिटन व युरोप येथें जाऊन तेथील काचकारखान्यांच्या कार्यपद्धतींचें निरीक्षण करून आले. विदेशी तंत्रज्ञांच्या साहाय्यानें नवा उपयुक्त माल तयार करण्याच्या कांहीं योजना त्यांनीं आपल्या बरोबर आणल्या आहेत व त्यांच्या खर्चासाठीं कंपनीनें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडे दीर्घ मुदतीचें कर्ज मागितलें आहे. अहवालाचे वर्षी कंपनीस सर्व खर्च, घसारा, इत्यादि भागवून ८,५९५ रु. निव्वळ नफा उरला. (मॅ. एजंटस: ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी)

### मुंबई राज्यांतील कंपन्या व उत्पादन

१९५०–५१ मध्यें मुंबई राज्यांत ३९६ नव्या लिमिटेड कंपन्या नोंदण्यांत आल्या, परंतु ३४२ जुन्या कंपन्या बंद पडल्या. म्हणजे, इतक्या कंपन्यांत गुंतलेलें बरेंच भांडवल बुडालें. चालू कारखान्यांची संख्या वाढली, तरी त्यांचें उत्पादन घटलें. औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स नंबर १९४९ मध्यें १०६·३ व १९५० मध्यें १०५·२ होता.

---

**कोळसा–खाणीकामगारांचा प्रॉव्हिडंट फंड**— कोल माइन्स प्रॉव्हिडंट फंडाच्या ट्रस्टींनीं फंडाचा फायदा घेणाऱ्या ३,४६२ मजुरांना अगर त्यांच्या प्रतिनिधींना फंडाची रक्कम परत केली आहे. मार्च १५ पर्यंत १,९३,५१५ रुपये इतकी रक्कम अशा रीतीनें परत करण्यांत आली.

**सरकारी मदतीशिवाय रस्ता**—साने गुरुजी सेवापथकानें परवानगी ह्या खेडेगांवापासून बोइसर–तारापूर मुख्य रस्त्यापर्यंत जाणारा ५ फर्लांगाचा रस्ता सरकारची मदत न घेतां नुकताच तयार केला. ह्या कामांत सेवापथकाला पर्नाळी गांवच्या शेतकऱ्यांनींहि चांगली मदत केली.

**रॉबर्ट क्लाइव्हच्या वंशजांचें दिवाळें**—भारतांतले पहिले गव्हर्नर क्लाइव्ह ह्यांच्या वंशजांनीं १९२७ सालीं पॉविस इस्टेट लिमिटेड ह्या नांवानें एक कंपनी काढली होती. कंपनीची स्वतःच्या मालकीची ७०,००० एकर जमीन आहे. धंद्यांत बूड आल्यानें कंपनीनें दिवाळें काढण्याचें ठरविलें आहे.

**लैला मजनूचें हस्तलिखित**— 'लैला आणि मजनू' ह्या प्रसिद्ध पर्शिअन काव्याची १५६३ सालीं लिहिलेली एक हस्तलिखित प्रत उपलब्ध झाली आहे. हें काव्य निझामी ह्या कवीनें लिहिलें आहे. ह्याच प्रतीच्या आधारानें मि. जेम्स ॲटकिन्सन ह्यांनी वरील काव्याचें इंग्रजी भाषांतर केलें होतें. मि. ॲटकिन्सन ह्यांच्या नातवानें आतां हें हस्तलिखित ६०० पौंडांना विकून टाकलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ३० एप्रिल, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापड–धंद्याची आजची परिस्थिति

### संरक्षणाच्या मागणीची पूर्वतयारी

मुंबईच्या कापड–गिरणी मालक संघाचे अध्यक्ष श्री. सोमानी, संघाच्या वार्षिक सभेच्या वेळीं कापड धंद्याच्या आजच्या परिस्थितीबद्दल ता. १४ एप्रिल रोजीं भाषण करतांना असे म्हणाले कीं कापडाच्या धंद्यांतील आजची मंदी ही तात्पुरती समजून तिच्याकडे दुर्लक्ष करणें अगदीं चुकीचें ठरेल. धंद्याचे चालक व सरकार यांनीं प्रयत्न केल्याशिवाय स्थिति सुधारणार नाहीं. कारण अमेरिका, ब्रिटन व जपान येथेंहि असाच प्रश्न निर्माण झाला असून त्यांच्या स्पर्धेला आपणाला तोंड द्यावें लागणार आहे. नियंत्रणें चालू ठेवावयाचीं असल्यास आजच्या परिस्थितीची संपूर्ण छाननी व चौकशी कमिटीमार्फत, वस्तुस्थिति समजून घेण्याच्या दृष्टीनें केली पाहिजे. १९४८ मध्यें कापडावरील नियंत्रण तात्पुरतें रद्द करण्यांत आलें होतें. त्याहून आजची स्थिति वेगळी आहे. आज वरील प्रकारच्या चौकशी कमिटी व्यतिरिक्त कापडाची किंमत कशी ठरवावी याचाहि विचार होणें जरूर आहे, व असा विचार करतांना सर्व प्रकारचा खर्च, व्याजाचा वांटा व धंद्यांत भांडवल पुन्हां गुंतविलें जाण्यासाठी मिळणारा नफा यांचा विचार झाला पाहिजे. सध्यां तात्पुरता उपाय म्हणून कापडावरील निर्यात कर व उत्पादनावरील कर कायमचे किंवा तात्पुरते रद्द करावे व मालाच्या निर्गतीवरील बंधनेंहि उठवावीं. १९५१ सालीं १३० कोटी पौंड सूत व ४०७ कोटी वार कापड उत्पादन झालें. १९५० चे हेच आंकडे अनुक्रमें ११७ कोटी पौंड सूत व ३६५ कोटी वार कापड असे होते. १९४९, १९५० व १९५१ या तीन वर्षी अनुक्रमें २५, २४ व २९ लक्ष गांठी कापड गिरण्यांनीं उत्पादन केलें व त्याच्या गिऱ्हाइकाला अनुक्रमें अंतर्गत बाजारपेठेंत २४, ३६ व २२॥ लक्ष गांठीं कापड उपलब्ध झालें. १९५१ सालीं निर्गतीवरील निर्बंध सुरू झाल्यामुळें अंतर्गत कापडाचा पुरवठा वाढला असला तरी मालाचा उठाव न झाल्यामुळें गिरण्यांजवळ कापड पडून राहिलें. १९५१ सालीं पूर्वीच्या वर्षाच्या मानानें नफा जास्त झाला असला तरी तो कापडाची परदेशांत निर्गत व कापसाची योग्य वेळीं खरेदी यांमुळें झाला असून तो वास्तविक कारखान्यांच्या अनुकूल परिस्थितीमुळें निर्माण झालेला नफा नव्हे. अशा विशिष्ट कारणांमुळें झालेला नफा वगळल्यास एका मागामागें २० आणे हा टॅरिफ बोर्डानें मान्य केलेला नफाहि उरत नाहीं. लँकेशायर व कॅनडा येथेंहि धंद्यासाठी सरकारी संरक्षण मागितलें जात आहे. हाँगकाँगच्या गिरण्यांना १८ महिन्यांनीं अमेरिकन कापूस मिळूं शकला. या आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीच्या अनुरोधानें आजच्या कापडधंद्यांतील मंदीचा विचार झाला पाहिजे.

उंची तलम माल ४० ते ५० टक्के किंमत उतरविल्याशिवाय बाजारांत खपूं शकत नाहीं. याचा अर्थ, उत्पादनावरील जकात कारखानदारांना सोसावी लागते. जाडेंभरडें हलकें कापडहि, १ मे पासून किंमती आणखी उतरतील या अपेक्षेनें खपत नाहीं. मालाच्या विक्रीची जबाबदारी गिरण्यांनीं पत्करावयाची तर कोणत्या मालाचें उत्पादन करावें व तो कोणाला विकावा या बाबतींत अनुभवजन्य माहितीचा गिरणी मालकांना उपयोग करतां आला पाहिजे. मजुरांची बेकारी टाळण्याची मालकांची इच्छा आहेच. परिस्थिति त्वरित न सुधारल्यास सावधगिरी म्हणूनच पाळ्या बंद करण्याच्या किंवा गिरण्या बंद करण्याच्या नोटिसा कांहीं गिरण्यांनीं दिल्या आहेत. उत्पादन कमी करून किंमती वाढविण्याचा यांत उद्देश नाहीं. चालू वर्षीं यावयाचा ठरलेला सर्व परदेशी कापूस आयात झाला तर १६ लक्ष गांठीं अमेरिकन कापूस उपलब्ध होईल, व १९५२ अखेर कापसाची परिस्थिति इतकी सुधारेल कीं त्यावरील निर्बंध रद्द करतां येतील. परंतु, परदेशच्या कापसाला द्यावी लागणारी किंमत व येथील कापडाच्या किंमती याचा मेळ साधला पाहिजे. असें न झाल्यास गिरणीवाले हिंदी कापसाची खरेदी करण्याचेंहि टाळतील व त्याचा परिणाम कापसाच्या किंमती उतरण्यांत होऊन त्यामुळें पुढील दोन वर्षांच्या कापसाच्या पेरणीवर अनिष्ट परिणाम होईल. १९५२–५३ या वर्षाचा गिरण्यांचा व्यापारी हिशेब ठरवितांना कापडाच्या अनिश्चित किंमतीमुळें कांहीं गिरण्यांना कापडाची किंमत कमी धरावी लागेल व त्यामुळें पुनर्रचनेसाठी राखून ठेविलेल्या रकमेंत कपात करावी लागून त्याचा गिरण्यांची सुधारणा करण्याच्या कामावर अनिष्ट परिणाम होईल.

फाळणीमुळें १०० कोटी वार कापड परदेशांत खपविण्याची जबाबदारी धंद्यावर आली आहे. परंतु पुनर्घटनेच्या योजनेप्रमाणें यश आल्यास कापड–धंद्याला स्वतःच्या उत्पादनक्षमतेपेक्षा जास्त मोठें असें अंतर्गत गिऱ्हाईक उपलब्ध होईल. नोकरवर्गाची सरकारी विमायोजना व कामगारांसाठी सक्तीच्या प्रॉव्हिडंट फंडाची योजना यांमुळें धंद्याला नवीन भार सोसावा लागत आहे, असे विचार श्री. विठ्ठल चंदावरकर यांनीं वरील भाषणाचे प्रसंगीं व्यक्त केले.

---

### " संपदा " वर्षारंभ विशेषांक

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेनें चालविलेल्या " संपदे " नें आठव्या वर्षांत पदार्पण केलें, त्यानिमित्त एप्रिल १९५२ चा अंक वर्षारंभ विशेषांक म्हणून काढण्यांत आला आहे. मराठा चेंबरनें महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीसाठी सतत प्रयत्न चालविलेले आहेत आणि महाराष्ट्रीयांच्या धंद्यांच्या हितसंबंधांचें रक्षण जागरूकपणें, कार्यक्षमतेनें व निरलसपणें केलेलें आहे. नव्या धंद्यांच्या उभारणीसहि हातभार लावलेला आहे. " संपदा " हें चेंबरचें मुखपत्र असून त्याच्यांतील लेख व माहिती ह्यांचा दर्जाहि चेंबरच्या लौकिकास साजेसाच असतो. प्रस्तुत विशेषांकानें चेंबरच्या ऋणानुबंधी लोकांचें जाळें कसें मोठें आहे, हें पुनः एकवार दाखवून दिलेलें आहे. अंकांतील लेख व लेखक ह्यांची विविधता लक्षांत भरण्याजोगी आहे. ( संपादकः–आ. रा. भट, एम्. कॉम. वा. वर्गणी ३ रु. विशेषांकाची किंमत १ रु. पत्ताः– ५८७/९, टिळकरोड, पुणें २ )

## भारतांतील पांच बड्या बँका

रिझर्व्ह बँकेनें बँक रेट वाढविल्यानंतर रोख्यांच्या किंमती उतरल्या, त्याचा परिणाम बँकांच्या ताळेबंदावर बराच होणें स्वाभाविक होतें. भारतांतील बँकांच्या पांच बड्या प्रस्थांची ह्या संबंधांतील परिस्थिति लक्षांत घेणें बोधप्रद होईल. इंपीरिअल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, बँक ऑफ इंडिया व युनायटेड कमर्शिअल बँक, हीं तीं पांच बडीं प्रस्थें होत.

ह्या पांच बँकांच्या ताळेबंदांची तुलना केली, तर १९५० चे मानानें १९५१ अखेर त्यांच्या ठेवींत ८ कोटी रुपयांची घट आढळते. त्यांच्या कॅश बॅलन्सेसमध्यें १९ कोटी रुपयांची घट झाली असून रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत १९५० चे मानानें १९५१ अखेर ५½ कोटींनीं कमी आहे. निश्चित व्याजाच्या रोख्यांच्या किंमतींतील उतार बँकांस फार जाणवूं नये, म्हणून बँकांना त्यांचे रोखे जुलै–डिसेंबर, १९५१ ह्या सहामाहींतील सरासरी बाजारभावानें ताळेबंदांत दाखविण्यास रिझर्व्ह बँकेनें सवलत दिली, त्या सवलतीचा फायदा इंपीरिअल बँक, बँक ऑफ इंडिया व युनायटेड कमर्शिअल बँक ह्यांनीं न घेतां त्यांनीं आपले रोखे बाजारभावानें किंवा त्यापेक्षा कमी दरानेंच ताळेबंदांत दाखविले. सेंट्रल बँकेनें पडलेली किंमतच धरली, त्यामुळें तिची जिंदगी बाजारभावापेक्षा ३ कोटी जास्त रुपयांनीं ताळेबंदांत दिसत आहे. बडोदा बँकेनें १९६२ पूर्वी ज्यांचें मुद्दल परत मिळणार आहे, अशाच रोख्यांची फक्त पडलेली किंमत धरली आहे; बाकीचे रोखे बाजारभावानें किंवा त्यापेक्षा कमी दरानें हिशेबांत घेतले आहेत. त्या कारणानें, बडोदा बँकेच्या रोख्यांची ताळेबंदांतील किंमत बाजारभावापेक्षा ३५ लक्ष रुपयांनीं अधिक आहे. ह्या दोन बँकांच्या ताळेबंदांवर रोख्यांच्या किंमत घटीचा परिणाम व्हावा तसा सहाजिकच झालेला नाहीं.

### पांच बँकांची जिंदगी व देणीं ( कोटी रुपये )

| | इंपीरिअल | सेंट्रल | इंडिया | बरोडा | यु. क. |
|---|---|---|---|---|---|
| देणीं : | | | | | |
| मुदती ठेवी | ३७ | ३४ | ९ | १४ | ११ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ३० | २७ | ९ | ६ | ३ |
| करंट व कॉन्टिन्जन्सी खातीं | १६४ | ६४ | ४० | ११ | १६ |
| एकूण ठेवी | २३१ | १२५ | ५८ | ३१ | ३० |
| जिंदगी : | | | | | |
| कॅश | २० | १५ | ५ | ३ | ३ |
| इन्व्हेस्टमेंट्स | ८५ | ६४ | १५ | ११ | १२ |
| कर्जे | १४० | ६१ | ४२ | १९ | १८ |

### उत्पन्न, खर्च व नफा ( लक्ष रुपये )

| | इंपीरिअल | सेंट्रल | इंडिया | बरोडा | यु. क. |
|---|---|---|---|---|---|
| मिळालेलें व्याज व डिस्कौंट | ४९८ | ४०३ | १५१ | ९८ | १०५ |
| दिलेलें व्याज | १२९ | १२४ | ३३ | ३२ | ३८ |
| पगार, भत्ते, प्रॉ. फंड | ३५२ | २१० | ६० | ३७ | ५५ |
| नफा | १३० | १२५ | ८० | २८ | ३५ |
| डिव्हिडंड (%) | १६ | १४ | १४ | १०+२ (बोनस) | ४ |

पांचीहि बँकांनीं मिळून दिलेलीं कर्जें ६५ कोटी रुपयांनीं वाढलीं आहेत. १९५१ चे प्रारंभींच कर्जें मुख्यतः वाढलीं, तरी बँक रेट बदलल्यानंतरहि कर्जांत थोडी वाढच झाली. बँकांजवळील रोखे, रोकड रक्कम व इतर ठिकाणच्या शिलका हीं सर्व त्यांनीं कमी केल्यामुळें कर्जांत वाढ होऊं शकली. वरील तक्त्यांत पांच बड्या बँकांचे येण्या–देण्याचे व उत्पन्न–खर्च–नफ्याचे तुलनात्मक आंकडे दिले आहेत. त्यावरून दिसून येईल कीं, सेंट्रल बँकेची एकूण जिंदगी इंपीरिअल बँकेच्या जिंदगीच्या निम्म्यापेक्षा कमी असूनहि तिचें व्याजाचें व डिस्कौंटचें उत्पन्न आणि नफा ह्यांचे आंकडे इंपीरिअल बँकेशीं बरोबरी करणारे आहेत. दिलेलें व्याज व मिळालेलें व्याज ह्यांच्या प्रमाणाची तुलनाहि बोधप्रद होईल. सर्वच बँकांनीं १९५० चें डिव्हिडंड १९५१ च्या वर्षासाठींहि कायम राखलें आहे.

---

### सरकारी नोकरांसाठी मोफत वैद्यकीय मदत

भारतीय सरकारनें आपल्या दिल्ली येथील नोकरवर्गाच्या आरोग्य रक्षणासाठी एक योजना लवकरच अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेचा फायदा सर्व प्रतीच्या नोकरांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणार आहे. अशा कुटुंबीयांची संख्या सुमारें १,५०,००० होईल असें वाटतें. ज्यांना योजनेचा फायदा मिळणार आहे, त्यांनीं थोडाबहुत खर्चही सोसावयाचा आहे. सरकारी नोकरांना सरकारतर्फे वैद्यकीय सल्लामसलत देणारे असे फक्त २५ डॉक्टर्स सध्या दिल्लींत आहेत; आणि तेहि आपला सर्व वेळ ह्या कामासाठीं खर्च करूं शकत नाहींत. कारण त्यांना सरकारी वैद्यकीय संस्थांतून काम करावें लागतें. नव्या योजनेप्रमाणें सरकारच्या वैद्यकीय नोकरींत असणाऱ्या डॉक्टरांनीं जर सरकारी नोकरांना औषधोपचार केला तर त्यांना त्याबद्दल फी घेण्याची मनाई करण्यांत येईल. खाजगी व्यवसाय करण्यास बंदी करण्यांत आल्यामुळें त्यांचें जें नुकसान होईल त्याबद्दल त्यांना त्यांच्या पगाराच्या अर्धी रक्कम देण्यांत येईल आणि गाडी–घोड्यांचा खर्चही देण्यांत येईल. पगाराची अर्ध रक्कम ४०० रुपयांपेक्षा अधिक असणार नाहीं आणि भाडेतो १५० रुपयांपेक्षा अधिक दिलें जाणार नाहीं. सर्व प्रतीच्या सरकारी नोकरांना आणि त्यांच्या घरांतील माणसांना वैद्यकी मदत मोफत मिळेल. सरकारचे चपराशीसुद्धां ह्या योजनेच फायदा घेऊं शकतील. त्यांना सध्याच्या नियमाप्रमा वैद्यकीय मदत सरकारी रीत्या मिळूं शकत नाहीं. सरकारी नोक रांनीं अगर त्यांच्या कुटुंबीयांनीं कांहीं उपचार करून घेतल असल्यास त्यांना ह्यापुढें आर्थिक साह्य मिळणार नाहीं. फ ज्या रुग्णालयांत फी घेतात अशा ठिकाणीं उपचार केले असल्यास तेवढा आकार मिळेल.

वरील योजना अंमलांत आणण्यासाठीं सरकारला दरवर्ष सुमारें १० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. हा ख भागविण्यासाठीं सरकारी नोकरांनीं दरमहिना कांहीं रक्कम द्याव याची आहे. चपराशांनीं दरमहिना आठ आणे आणि २,००० अगर अधिक पगार असणाऱ्यांनीं दरमहा सहा रुपये द्यावया आहेत. ह्या दोन टोकांच्या दरम्यान असणाऱ्या सरकारी नोकरां आपआपल्या पगाराच्या मानानें वर्गणी द्यावयाची आहे. भारती सरकारच्या संरक्षण खात्यांतील मुलकी नोकरांना मोफत वैद्यकी उपचाराची सोय आतांपर्यंत नव्हती. नवीन योजनेचा फाय त्यांनाहि घेतां येणार आहे. भारतीय सरकारच्या आरोग्यमं राजकुमारी अमृत कुअर, ह्यांनीं ही योजना आखली आ संकल्पित योजना आहे त्या स्वरूपांत कशी काय यशस्वी हे तें पाहून दिल्लींतील इतर बिन–सरकारी लोकांना सुद्धां ती ल करण्याचा त्यांचा विचार आहे.

# हिंदुस्थानांतील बँकांची युद्धोत्तर पुनर्रचना

## मोठ्या बँका आणि प्रादेशिक बँका ह्यांचे गुणदोष

### सुवर्णमध्य साधण्याचें अगत्य

लेखक : चिन्तामणी विश्वनाथ जोग, बी. कॉम, एफ्. आय. बी. ( लंडन. ) C/o बँक ऑफ महाराष्ट्र, लि. पुणें २.

कुठल्याही उद्योगधंद्यांत किंवा व्यापारांत जेव्हां सारखी समृद्धि वा वाढ होत असते त्यावेळेला त्यांतून होणाऱ्या फायद्यांना सुसूत्रता देणें किंवा त्या वाढीला योग्य तें वळण लावणें व आकार देणें याकडे कचित्च लक्ष दिलें जातें. पण एकादा धक्का बसला किंवा मंदीची–ओहोटीची चाहूल लागली कीं मग हा उभा झालेला डोलारा कोसळायच्या आंत तिकडे लक्ष दिलें पाहिजे अशी भावना निर्माण होते. कांहींशी तशीच परिस्थिति हिंदुस्थानांतल्या बँकिंगच्या धंद्याची झाली. जगड्व्याळ युद्ध संपून सात वर्षें झालीं तरी त्याचे दुष्परिणाम अजून नाहींसे झाले नाहींत आणि ही परिस्थिति कां नि कशी निर्माण झाली, हें कळण्यासाठीं नि हिंदुस्थानांतील बँकांपुढें आज कुठले विचारप्रवाह वहात आहेत हें बघण्यासाठीं आपल्याला थोडेसें भूतकालाचें म्हणजे रिझर्व बँकेच्या स्थापनेपासूनचें सिंहावलोकन केलें पाहिजे. अर्थात् तें करीत असतां फक्त पुनर्रचनेचाच प्रश्न आपण बघणार आहोंत. बँकांची कार्यपद्धति, त्यांची कर्जें द्यावयाची शक्ति, त्यांवर नियंत्रण असावें कीं नसावें, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील बंधनें, राष्ट्रीयीकरण, हे प्रश्न इतके मोठे आहेत कीं त्यांचा परामर्श या लहान जागेंत घेतां येणें कठीण आहे. त्यामुळें पुनर्रचनेंत आपण बांधणी ( Structure ) याचाच विचार करूं.

### रिझर्व्ह बँकेच्या पूर्वींची परिस्थिति

१९३४–३५ सालीं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना होईपर्यंत हिंदुस्थानला मध्यवर्ति बँक अशी नव्हती, नि अर्थातच मध्यवर्ति बँक नसल्यानें इतर बँकांवर तिचें नियंत्रण असण्याची सोयही नव्हती. इंपीरियल बँक हीच त्यावेळेला रिझर्व्ह बँकेचें काम करी, पण तिला मध्यवर्ति बँकेचे अधिकार नसल्यानें इतर बँकांवर तिचा अधिकार चालत नव्हता. जो चालत होता तो वडील बहिणीसारखा. प्रत्येक बँकेचें धोरण कसें असावें याला एक असें बंधन नव्हतें. 'बँकिंग' या क्षेत्राची सर्वांगीण वाढ करण्यासाठीं एक मध्यवर्ति संस्था पाहिजे नि इतर सर्व बँकांत कांहींएक मूलभूत तत्त्वाबाबत ( Fundamental Principles ) एकवाक्यता पाहिजे, असें कुणाला वाटलें नव्हतें. १९३५ सालीं रिझर्व्ह बँकेची स्थापना होईतोंपर्यंत हिंदुस्थान या क्षेत्रांत खूपच मागासलेला होता. पण १९३५ सालीं रिझर्व्ह बँक अस्तित्वांत आली, चलननियंत्रण सरकारकडून तिच्याकडे सोपविण्यांत आलें नि हिंदुस्थानांतील बँकांना बांधणारें पहिलें बंधन निर्माण झालें.

### १९३५ ते १९३९

१९३५ ते १९३९ पर्यंत म्हणजे दुसरें महायुद्ध सुरू होईपर्यंतचा काळ मंदीचा नव्हता पण तितकाच तेजीचाही नव्हता. बँकांना या काळांत आपली प्रगति आपले इच्छेनुसारच करावी लागली नि ती फारच धीमे धीमे झाली. आंकड्यांत बोलायचें झालें तर १–१–१९३७ ला भारतांत ( त्यावेळेस पाकिस्तान निर्माण झालें नव्हतें ) शेड्यूल्ड बँका ५० होत्या, त्यांच्या शाखा ८०० होत्या व एकूण ठेवींचा आंकडा २३० कोटी रु. होता. १९३९ सालीं म्हणजे युद्ध उंबरठ्यावर उभें राहून पाऊल टाकायच्या विचारांत होतें, तेव्हां फक्त ११ शेड्यूल्ड बँका वाढल्या होत्या. एकूण शेड्यूल्ड बँका ६१, एकूण ठेवी २५० कोटी रु. नि वापरांतील चलन २३० कोटी रु. हे तेव्हांचे आंकडे होत; ठेवी नि वापरांतील चलन यांचें हें प्रमाण हिंदुस्थानांत बँका कशा आस्तेकदम पायघड्या घातल्यासारखी प्रगति करीत होत्या याचें निदर्शक आहे. युद्धपूर्व कालखंडाचा हा बोलका इतिहास आहे. आज ( १९५१ सालीं ) पाकिस्तान सोडून उरलेल्या भारतांत शेड्यूल्ड बँका ९५, त्यांची ऑफिसेस २६७६, ठेवी ८७० कोटी रु. व वापरांतील चलन ११४१ कोटी रु. अशी परिस्थिति आहे.

### युद्धकाळ

आणि मग १९३९ च्या सप्टेंबरमध्यें महायुद्धाचा भडका उडाला. प्रत्येक राष्ट्र चलनवाढीच्या दुष्ट चक्रांत सांपडलें. काय होत आहे नि काय करायचें इकडे बघायची इच्छा असूनही कुणाला वेळ नव्हता. सरकार–बँका–अर्थपद्धति यांचा अन्योन्य संबंध कसा आहे, इकडे कुणी यावेळेस बघत नाहीं. राष्ट्र जगायचें असेल तर, सरकारला तारायचें असेल तर, वाटेल तो मार्ग स्वीकारणें योग्य ठरतें. युद्धाला सहाय्यकारक होईल अशा सर्व गोष्टी प्रथम करणें हें आद्यकर्तव्य ठरतें, त्यामुळें युद्धविषयक प्रत्येक बाब इतर बाबींना सहाजीकच मागें ढकलत होती. सरकारला पैसा पुरवणें नि युद्धनिगडित असलेल्या धंद्यांना उत्तेजन देणें, सहाय्य देणें, कर्ज देणें नि मदत करणें येवढेंच करण्यांत येत होतें. ( Only War was financed. )

चलनवाढ अपरिहार्य झाली होती नि त्या चलनवाढीमुळें बँकांच्याकडील ठेवीही खूप वाढल्या. पैसा खूप वाढल्यामुळें या काळांत बँकांची प्रगति अमर्याद झाली. १९३९–१९४५ हीं सहा वर्षें म्हणजे बँकांच्या उत्कर्षाचा काळ ठरला. झालेली चलनवाढ रिचविण्याचें काम बँकांवर पडलें होतें, नि वाढ नि सर्व बाजूंनीं वाढ ( Progress and Progress all round ) असा प्रकार चालू होता. तेव्हां हिंदुस्थानांतील बँकांनीं फार मोठा टप्पा गांठला. १९४६ सालीं शेड्यूल्ड बँकांची संख्या ६१ वरून ९६ वर गेली. ठेवींचा आकडा २५० कोटी रु. वरून १०११ कोटी रु.वर गेला नि ८०० शाखाऐवजीं ३,१०० शाखांचा प्रचंड वटवृक्ष उभा राहिला. पुष्कळशा नवीन बँका निघाल्या. जुन्या बँकांनीं आपला शाखाविस्तार अमर्याद वाढविला.

### युद्धोत्तर परिस्थिति

पण मग १९४५ सालीं युद्ध संपलें. पहिलीं दोन वर्षें त्याचा तितका परिणाम वाटला नाहीं. पण १९४७ सालीं मंदीची ( Recession in Business Activity ) लाट किंचित् सुरू झाली. ( As compared to the business activity during war years, there was recession in this activity after the

close of war.) किंमती कमी होत नव्हत्या व उत्पादन घटत होतें; नि १९४७ ते १९५१ या चार वर्षांत ही परिस्थिति पुष्कळच लक्षांत येण्याजोगी पालटली. लोकांच्या हातांतला पैसा हळु हळु कमी होऊं लागला नि बँकांतील ठेवींही कमी होऊं लागल्या. बेकारी वाढूं लागली नि या तडाख्यांत इंटर नॅशनल बँक ऑफ इंडिया, ए. बी. सी. बँक नि एक्चेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका यांसारख्या मोठ्या बँका एका पाठोपाठ कोसळल्या नि बुडाल्या, नि बँक फेल्युअर्स ज्याला म्हणतात त्याचा घक्का एकदम बसला. लोकांत किंचितसें भीतीदायक वातावरण उत्पन्न झालें. उरलेल्या बँकांना युद्धकालांत काढलेल्या अनेक ठिकाणच्या शाखा फायदेशीर होत नाहींत असें दिसून येऊं लागलें. अशा परिस्थितींत या शाखा बंद करण्याचा सूर निघूं लागला व तशा पुष्कळ बँकांच्या कांहीं शाखा बंद झाल्या. पण मग तिथल्या नोकरवर्गाचा प्रश्न निर्माण झाला. बेकारींत या असंतोषाची भर घालणें कितपत योग्य, हा एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला.

### एकत्रीकरणाचे विचार

साधारणपणें शेंकडा ३५ टक्के (नफ्याच्या) खर्च नोकरवर्गावर (Establishment) वर होतो व तो कमी केला तर नफा वाढून काटकसर होईल अशा दृष्टीनें दोन किंवा तीन लहान बँकांचें एकत्रीकरण करून मोठ्या बँका करण्याची कल्पनाहि निघाली व त्या दृष्टीनें भारत व पंजाब नॅशनल बँक या एक झाल्या, तर बंगालमध्यें चार बँका एकत्र करून 'युनायटेड बँक ऑफ इंडिया' ही मोठी बँक काढण्यांत आली. हल्लीं बँकांच्या बांधणीबद्दल-रचनेबद्दल-हाच विचार प्रामुख्यानें मांडण्यांत येत आहे. इंग्लंडमध्यें जशा मोठ्या अशा पांचच बँका (Big Five) आहेत तशाच हिंदुस्थानांत देखील लहान लहान बँका एकत्र करून पांच-दहाच मोठ्या बँका असाव्यात व त्यांच्या शाखा सर्व ठिकाणीं असाव्यात म्हणजे कारभारांत एकसूत्रीपणा येईल व सर्चांत काटकसर होईल असा मोठा दावा या कल्पनेचे पुरस्कर्ते मांडतात. पण या कल्पनेंतील हे फायदे बाजूला ठेवून त्यांत दोष किती आहेत याकडे कुणीच लक्ष देत नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे ब्रिटनमधील बँकिंगची पद्धति खूपच पुढारलेली असून ती आपल्याकडे लागूं करणें कितपत शक्य आहे याचा विचार इथल्या परिस्थित्यनुरूपच केला पाहिजे. नाहींतर इंग्लंडमध्यें उन्हाळ्यांतही वुलन सूट घालतात म्हणून अत्युग्र वततेच्या नांवाखालीं आपणहि इकडे तसेंच करण्यापैकीं प्रकार व्हावयाचा. कारण, तसें करण्यापूर्वी इंग्लंडमधील उन्हाळ्यांतील उष्णतामान हें आपल्याकडील थंडींतील उष्णतामानाइतकेंच असतें हा विचार केला पाहिजे. तद्वत्च, इंग्लंड हा देश मुंबई राज्यापेक्षांही लहानच असून तिथें अशिक्षितता जवळ जवळ नाहीं. येवढ्याशा या देशांत सुद्धां असणाऱ्या पांच प्रमुख बँकांपैकीं कांहींच्या शाखा सुमारें २,००० च्या वर आहेत, इतकी बँकिंगची सवय त्यांच्यांत भिनली आहे. या उलट, हिंदुस्थान हा अगडबंब देश आहे. इथल्या एका राज्याची परिस्थिति, आर्थिक कुवत किंवा इतर गोष्टी दुसऱ्या कुठल्याही राज्याबरोबर समान नाहींत किंबहुना, हिंदुस्थान हें अशा छेटया छोट्या अनेक राष्ट्रांचें संयुक्त राष्ट्र (Federation) आहे, असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. संपूर्ण आर्थिक दृष्ट्या, किंवा अन्नदृष्ट्या हिंदुस्थान स्वयंपूर्ण असूं शकेल. पण मामुली काळांत प्रदेशवार बघितलें तर महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या अधन दिसेल, गुजराथ अन्नदृष्ट्या पंजाबवर अवलंबून राहील, वगैरे. तात्पर्य, येथें प्रत्येक प्रदेशाची भाषा निराळी, आचार निराळे, रूढी निराळ्या, तेथल्या लोकांची राहण्याची पद्धत निराळी, व्यापार करण्याची पद्धत निराळी. बंगालमध्यें ज्यूटचा मुख्य व्यापार आहे तर संयुक्त प्रांतांत साखरेचे कारखाने जास्त आहेत. पंजाबमध्यें कॅनालमुळें शेती जास्त होते; तर महाराष्ट्राची परिस्थिति सगळीच वेगळी आहे. या प्रत्येक ठिकाणीं शेतकऱ्याला वा कारखानदाराला कर्ज वेगवेगळ्या वेळीं लागूं शकेल, त्याची फेड करण्याची पद्धत वेगळी असेल. उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांत असाच भेद दिसेल. तव्हा असे विभिन्न प्रदेश असतां त्यांना एक पद्धत लावणें जमणार नाहीं. अशिक्षितपणा आपल्याकडे ९०% आहे. बँकेसारख्या आधुनिक संस्थेशीं किंवा 'आर्थिक रचना' या विषयांशीं कित्येक सुशिक्षितांची सुद्धा तोंडओळख नसूं शकते. त्यामुळें अशी योजना हिंदुस्थानांत फलदायी ठरेलच असें सांगतां येणार नाहीं. भाषावैचित्र्य नि स्थानिक पगडा (Local Influence) या दोन गोष्टींची वरच्यांत भर पडेल ती वेगळीच. अजून आपल्याकडे खेड्यांची सुधारणा व्हावयाची आहे. अशा ग्रामीण विकासासाठी वरील बांधणी कितपत उपयोगी पडेल याची शंका आहे. या पद्धतींत ठिकठिकाणच्या शाखांमधून ठेवीदार-कर्जदार यांच्याशीं इष्ट असणारा निकट संबंध येऊंच शकणार नाहीं.

### प्रादेशिक बँकांची कल्पना

हे सर्व गुणदोष विचारांत घेतले कीं मग असा प्रश्न उभा रहातो कीं मग यावर उपाय काय? वरील पद्धत जर अंमलांत आणावयाची नाहीं तर मग सध्याच्या अनेक बँकांत सुसूत्रता कशी यावी? आतां आपण स्वतंत्र झालों आहोंत. अर्थव्यवस्था भक्कम नि मजबूत व स्थिर करण्यासाठी मग बँकांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा? मोठ्या बँकांनीं लहान खेड्यांत शाखा चालवणें फायदेशीर होत नाहीं, म्हणून त्या बंद केल्यास तेथें बँकिंगचा प्रसार कसा व्हावा?

याला उपाय म्हणजे सध्याच्या बांधणीचा नि वरील कल्पनेचा सुवर्णमध्य सांधणें. गुणांचा गुणाकार नि दोषांची वजाबाकी या सूत्राचा अवलंब केला तर लहान बँका ज्या सध्या भूछत्रासारख्या (Mushroom) आहेत त्यांना आळा बसेल नि मोठ्या बँकांतून दुर्लक्षिला जाणारा वैयक्तिक लक्षाचा (Individual Attention) प्रश्नहि सुटेल. हा सुवर्णमध्य असाः- मोठ्या पांच-दहा बँका निर्माण करून त्यांनीं फक्त मोठ्या शहरांत आपल्या शाखा उघडाव्यात, नि बाकीचें बँकिंग हें प्रादेशिक बँकांवर सोपवावें (Regional Banks). अशा प्रादेशिक बँकांच्या शाखा खेड्यापाड्यांतून निघून दूरवर बँकिंगचा प्रसार होईल. या प्रादेशिक बँकांनीं मोठ्या बँकांच्या प्रतिनिधित्वाचें काम करावें. पण त्या त्या प्रांतांत त्या सार्वभौम असाव्यात. (They should act as agents to these Big Five or Ten without losing their own identity.) त्यांनीं उगीच दिल्ली, मद्रास, कलकत्ता अशा ठिकाणीं भ्रममूलक शाखा (Show-Branches) काढूं नयेत नि खर्च वाढवून घेऊं नये. या उलट, वरील मोठ्या बँकांनीं जुन्नर, खेड, मंचर सारख्या ठिकाणीं शाखा काढून स्पर्धा निर्माण करूं नये. शिवाय, त्यांना तेथल्या परिस्थितीची कल्पना येणार नाहीं तें वेगळेंच. कारण तेथल्या लोकांचा गांवच्या पाटलावर जितका विश्वास असेल तितका या बँकांच्या शाखांवर—मग ती एखाद्या क्रोडोपतीची का

असेना-बसणार नाहीं. कारण, तीं माणसें त्यांच्या रोजच्या परिचयाची नसतात. ठेवींबाबत हा प्रकार झाला तर कर्जाच्या बाबतींत उलट होईल. तेथले लोक संपूर्ण माहीत नसल्यानें तेथल्या एजंटाला फसवले जाण्याची जास्त भीति रहाते. यासाठी मोठ्या बँकांनीं त्यांच्याजवळ जर जास्त पैसा झाला (Surplus Funds) तर तो या लहान बँकांना यावा नि त्यांनीं तो खालीं लहान लहान गांवांतून वापरावा. या उलट, मोठ्या शहरांतील कामें या प्रादेशिक बँकांनीं या मोठ्या बँकांकडे सोपवावींत. असें जाळें निर्माण झालें कीं आपोआपच सुसूत्रता येऊन कार्यक्षमता वाढेल, म्हणजे श्रमविभागणी (Division of Labour) होईल नि एक स्थिर अर्थव्यवस्था निर्माण होईल.

### सरकारचें कर्तव्य

अर्थात्, हा विचार फक्त ज्याला बांधणी (Structure) म्हणतात त्यापुरताच आहे. बँकांचा विस्तार केवढा असावा याबद्दल सध्यां जी चर्चा चालली आहे तिच्यावर विचार करून कोणती पद्धत स्वीकारावी हें ठरविणें सरकारचें काम आहे. पण कोणताही निर्णय घेतांना दोन्ही बाजू पुढें असाव्या लागतात. त्या दृष्टीनें मोठ्या बँका किंवा प्रादेशिक बँका यांचे गुणदोष येथें मांडले आहेत.

आपल्या स्वतंत्र भारतवर्षाच्या कीर्तींत भर घालेल अशी मजबूत पायावर उभारलेली नि वाटेल त्या परिस्थितींत तग धरून सर्वसामान्य जनतेपर्यंत या आधुनिक अर्थव्यवस्थेचे लोण पोचविणारी अशी बांधणी असलेली पद्धत अंमलांत आणण्याची कुठलेंही सरकार कोशीस करील, अशीच आशा नि खात्री आपण बाळगून तसें करावयास भाग पाडलें पाहिजे.

---

### ट्रॅक्टर्ससंबंधी ताजे आंकडे

१९५० सालीं अमेरिकेनें ५,४२,००० ट्रॅक्टर्स तयार केले व त्यांपैकीं ९०,००० ट्रॅक्टर्स परदेशीं विकले. ग्रेट ब्रिटननें १,२०,००० ट्रॅक्टर्स तयार करून ८४,००० ट्रॅक्टर्सची निर्गत केली. सबंद जगांत एकूण ९,०६,००० ट्रॅक्टर्सचें उत्पादन झालें आणि एकूण निर्गत १,९२,००० ट्रॅक्टर्सची झाली. म्हणजे, ट्रॅक्टर्सच्या उत्पादनापैकीं ६०% अमेरिकन होतें आणि जागतिक निर्गतींत अमेरिकेचा वाटा ४७% होता. ग्रेट ब्रिटनमधील उत्पादन १३% होतें, पण जागतिक निर्गतींत ब्रिटिश ट्रॅक्टर्सची निर्गत ४४% होती. ग्रेट ब्रिटनमध्यें तयार झालेल्या प्रत्येक १० ट्रॅक्टर्स पैकीं ७ ट्रॅक्टर्सची निर्गत झाली. ग्रेट ब्रिटन व रशिया सोडून उरलेल्या युरोपांत १,२३,००० ट्रॅक्टर्स तयार करण्यांत आले. त्यांपैकीं फक्त १०,००० ट्रॅक्टर्सची निर्गत झाली. सर्वांत मोठी आयात (५२,०००) कॅनडानें केली. त्याचे खालोखाल युरोप (३६,०००), ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड (३४,०००), लॅटिन-अमेरिका (२५,०००), आफ्रिका (१७,०००), अतिपूर्व (५,०००), मध्यपूर्व (३,०००), असे आकडे आहेत.

---

### चहाचें उत्पादन

भारत, पाकिस्तान, सिलोन व इंडोनेशिया ह्या सर्वांचें मिळून चहाचें उत्पादन १९५१ मध्यें ११० कोटी पौंड झालें; १९५० मध्यें तें १०४ कोटी पौंड झालें होतें. उत्तर भारतांतील उत्पादन थोडेसें घटलें, परंतु दक्षिण भारतांत तें १३ कोटी पौंड जास्त झालें.

## दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें.

### मॅनेजरांनीं अधिक लक्ष घालण्याबाबत अध्यक्षांची सूचना

पुणें डेक्कन बँक्स असोसिएशनची पहिली सर्वसाधारण सभा दि. १९ एप्रिल रोजीं श्री. प्रों. कृ. साठे यांचे अध्यक्षखालीं झाली. त्यावेळीं त्यांनीं पुढील प्रमाणें भाषण केलें:—

"डेक्कन बँक्स असोसिएशनच्या स्थापनेपासून तों ३१ डिसेंबर, १९५१ अखेरपर्यंतच्या जमाखर्चासह अहवाल आपल्यापुढें मंजुरीकरितां ठेवतांना मला समाधान वाटतें. खरें पाहिलें तर भारतांतील इतर बँकांचा अवाढव्य पसारा पाहतां आपल्या बँका फारच लहान व त्यांचें प्रमाणही कमी. अशा स्थितींत त्यांचा संघ स्थापन करून तो यशस्वी करून दाखविणें हें काम फार कठीण आहे. आणि तें किती कठीण आहे याचें प्रत्यंतर म्हणजे महाराष्ट्रांतील अनेक बँका संघाच्या अजून सभासदही झाल्या नाहींत, यावरूनही लक्षांत येईल. बँकिंगचा धंदा महाराष्ट्रांत अगदींच बाल्यावस्थेंत आहे. याचीं कारणें अनेक असलीं तरी महाराष्ट्रांत व्यापारी वर्ग कमी, आणि जे व्यापारी आहेत त्यांच्या देवघेवीचें क्षेत्र बड्या व्यापाऱ्यांच्या मानानें अल्पच आहे. परंतु येत्या कांहीं वर्षांतच डेक्कन मधील व्यापारीवर्गाची वाढ होईल व आज लहान असलेल्या बँका या त्या प्रगतीबरोबरच वाढतील यांत मला संशय वाटत नाहीं. आणि म्हणूनच उद्यां होणाऱ्या संयुक्त महाराष्ट्रांतील, बँकांची वाढ होण्यास आपल्या संघाचा उपयोग होणार आहे. या दृष्टीनें संस्थांच्या बाबतींत कोणतेंही कार्य यशस्वी व्हावयास कांहीं काळ जावाच लागतो हें लक्षांत घेतलें म्हणजे पहिल्या वर्षीं संघाकडून फारसें काम झालें नाहीं याबद्दल विषाद वाटण्याचें कारण नाहीं.

"गेल्या वर्षांत कार्यकारी मंडळाच्या एकूण सहा सभा झाल्या. या सहा सभांमध्यें झालेलें काम हें अगदीं मामुली आहे यांत शंकाच नाहीं. पण त्यामुळें निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. आपला एक संघ आहे हीच मोठी गोष्ट होय. या वर्षांत मुंबई प्रांताचे अर्थमंत्री ना. वैकुंठराय मेथा यांनीं संघाला भेट दिली तेव्हां संघाच्या आवश्यकतेसंबंधीं समाधानच व्यक्त केलें आहे. संघानें त्यांचा जसा सत्कार केला त्याचप्रमाणें महाराष्ट्र बँकेचे मॅनेजर श्री. जोग हे व्यावसायिक शिक्षणासाठीं इंग्लंडला गेले तेव्हां त्यांचा सत्कार केला.

"या वर्षांत आपल्याकडे जमा झालेली वर्गणी व प्रवेश फी याचा विनियोग किती काटकसरीनें आपण करीत आहोंत हें सभासदांकडे पाठविलेल्या जमाखर्चाच्या ताळेबंदावरून लक्षांत येईलच अधिक सभासद वाढण्यासाठी आपणांपैकीं प्रत्येकानें थोडे जरी प्रयत्न केले तरी ते सहज वाढतील व तसे प्रयत्न त्यांनीं करावेत अशी माझी त्यांना विनंती आहे. त्या दृष्टीनें डेक्कन स्टेट्स बँक्स असोसिएशन ही संस्था आतां आपल्याच संघांत विलीन करण्यांत यावी अशी माझी सूचना आहे. त्याबाबी सदर संस्थेच्या सभासदांनीं विचार करावा. संघाचें कार्यास व्यापकपणा येण्यासाठीं सभासद-बँकांचे मॅनेजर्स अथवा मॅनेजिंग डायरेक्टर्स यांनीं अधिक लक्ष घालावें अशी एक माझी अखेरची सूचना आहे. याचा आपण अवश्य विचार करावा."

## बाजारांतील आकस्मिक मंदी

(श्री. डी. डी. देशपांडे, मॅ. डिरेक्टर, न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.)

गेले १०–१२ दिवस सगळीकडे एकच गोष्ट प्राधान्यें करून चार्चेली जात होती, ती म्हणजे निरनिराळ्या वस्तूंचे सारखे खालीं जाणारे भाव. सोनें १०६ रुपयांवरून घसरत घसरत ८५–८६ पर्यंत आलें; तेल, बीबियाणें, कापूस या सर्व पदार्थांच्या किंमती सारखी घटच दर्शवीत होत्या व हें दृश्य एका दृष्टीनें अभूतपूर्व होतें. गेल्या ८–१० वर्षांत जनतेला भाववाढ एवढीच गोष्ट माहीत होती. परंतु ज्या वेगानें भावांत गेल्या ८–१० दिवसांत घट झाली, त्या द्रुतगतीनें भावांत वाढ झाली नव्हती. भाव सारखे वाढत होते, परंतु ते क्रमशः वाढत होते. परंतु आतां बाजारभावांनीं विद्युल्लतेची चमक दाखविली व साहजीकच विजेच्या तळपण्यानें डोळे दिपतात, त्याप्रमाणें भावांच्या आकस्मिक घसरगुंडीनें विशेषतः व्यापारीवर्ग हादरून गेला.

व्यापारीवर्गानें गेल्या ८–१० वर्षांत आपल्या अतिलोभी वृत्तीमुळें सामान्य जनतेची सहानुभूति गमावली असल्यामुळें, सामान्य जनतेला एकप्रकारें समाधानच वाटत होतें व व्यापारीवर्ग मात्र सर्वस्व गमावलें, अशा कांगावखोर वृत्तीनें, ह्या भावाच्या घटीकडे पहात असल्यामुळें, एक प्रकारचें आर्थिक संकट कोसळेल कीं काय, अशा प्रकारचें वातावरण निर्माण झालें.

### घटना अपेक्षित व अपरिहार्य

ह्या भावाच्या घसरगुंडीकडे जरा चिकित्सक दृष्टीनें पाहिल्यास ही घटना सर्वस्वी अपेक्षित व अपरिहार्यच होती हें दिसून येईल. गेलीं ८–१० वर्षें सर्व पदार्थांचे भाव जे सारखे वाढत होते, ती भाववाढ नैसर्गिक नसून अत्यंत कृत्रिम अशी होती. महायुद्धाचे निमित्तानें सरकारनें सर्व पदार्थांची साठेबाजी सुरू केली व सरकारला सर्व तऱ्हेचा माल पुरविण्याची मक्तेदारी बानिया वर्गाला मिळाली. त्यामुळें कृत्रिम तऱ्हेनें पदार्थांची चणचण भासूं लागली व ते पदार्थ सर्वस्वीं भमिगत होऊं नयेत म्हणून नियंत्रणें लादण्यांत आलीं. नियंत्रणें फायदेशीर होऊं शकतात हें खरें. पण केव्हां! जेथें निःस्वार्थी, निर्लोभी, देशाभिमानप्रेरित व जनतेच्या हिताचे दृष्टीनें कार्य करणारी अशी कार्यपद्धति व संघटना असेल तेव्हांच. परंतु भारतांत ही सर्व नियंत्रणयोजना बानिया लोकांचे हातांत गेल्यामुळें, व पूर्वीचें ब्रिटिश सरकार व सध्यांचें भारत सरकार ह्या दोघांचेहि लागेबांधे व्यापारी वर्गाशीं निकटचे असल्यामुळें, ही नियंत्रणपद्धति कुचकामी ठरली व सर्वसाधारण जनतेला हलाखी भोगावी लागली.

ह्या स्वार्थी प्रवृत्तीमध्येंच जागतिक हालचालींचेंहि प्रतिबिंब पडत राहिलें. दुसरें महायुद्ध संपलें नाहीं तोंच तिसऱ्या महायुद्धाची भाषा सुरू झाली; अमेरिका–ब्रिटन व रशिया या दोन गटामध्यें राजकीय सत्तास्पर्धा सुरू झाली व शांतताप्रस्थापनेच्या नांवाखालीं शस्त्रास्त्र-निर्मितीची वारेमाप वाढ सुरू झाली, त्यासाठीं पुन्हां भरमसाट पदार्थांची खरेदी सुरू झाली, व पदार्थांच्या भावामध्यें सारखी वाढच सुरू राहिली. त्यांतच कोरियन युद्धामुळें महायुद्धाची ठिणगी पडून सर्वत्र आगीचा डोंब उसळेल व त्या आगीवर आपली पोळी भाजून घेऊं अशी व्यापारी वर्गाला आशा सुटली, व सारखी सांठेबाजी सुरू राहिली. या सर्व कारवायांचा परिणाम म्हणून सर्वसाधारण जनता

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
१ माहीम
१ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस–गिरगांव, मुंबई.

पिळून निघाली. जनतेची क्रयशक्ति कमी होत चालली. कोरियन युद्धांत दोन्ही झुंजणाऱ्या पक्ष्यांना परस्परांच्या बळाची कल्पना आली व तिसरें महायुद्ध सध्यातरी पेटविणें दोघांच्याहि हिताचें नाहीं, हें पटल्यामुळें, पिपासुवृत्तीनें तिसऱ्या महायुद्धाची वाट पहाणाऱ्या व्यापारीवर्गाची निराशा झाली.

शक्य तितकी सट्टेबाजी व सांठेबाजी केल्यानंतर निसर्गाची प्रतिक्रिया प्रभावी ठरून, सांठेबाजांना मालाच्या उठावाच्या अभावी, व माल खराब होण्याचे भीतीमुळें मालाच्या किंमती उतराव्या लागल्या. ज्याप्रमाणें मालाच्या किंमतींतील वाढ ही बहुंशीं कृत्रिम होती त्याचप्रमाणें सध्यांची भावांतील घटहि आकस्मिक तऱ्हेनें निर्माण करून, आर्थिक योजना कोसळून पडेल असा आभास निर्माण करून, भारत सरकारवर अयोग्य तऱ्हेनें दडपण आणून मालाला परदेशीं रवाना करण्याची परवानगी मिळविण्याचा हेतु, ह्या सर्व कारवायांच्या मागें व्यापारी श्रेष्ठींचा नसेलच असें मानण्यास जागा नाहीं.

### नैसर्गिक प्रतिक्रियेबद्दल खात्री

व्यापारी श्रेष्ठींच्या कारवायास भारत सरकार कितपत बळी पडेल हें आतांच सांगतां येणार नाहीं; तथापि, भारत सरकार व व्यापारी श्रेष्ठी ह्यांची ही अभद्र युति कायम राहूं शकणार नाहीं, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. आज राजकीय संघटनेवर ताबा असलेल्या कॉंग्रेस श्रेष्ठांना जनतेला डावलतां येणार नाहीं, ह्याची जाणीव होऊं लागली आहे; व व्यापारीवर्गाला पाठीशीं घालून जनता-द्रोह अधिक करण्याची कॉंग्रेसश्रेष्ठींची तयारी रहाणार नाहीं. शिवाय, सर्व जागतिक कालप्रवाहांत जी नैसर्गिक प्रतिक्रिया होत रहाते, ती प्रतिक्रिया कोणतीहि राजसत्ता डावलूं शकत नसल्यामुळें मानव व निसर्ग ह्यांच्यांतील रस्सीखेंच जी गेलीं १०–१२ वर्षें सुरू होती, तीमध्यें मानवाचा पराभव होऊन निसर्ग प्रभावी बनून, पुन्हा जागतिक परिस्थितीची गाडी रुळावर येईलच येईल, अशी खात्री पटण्याइतका ऐतिहासिक पुरावा आहे. ज्याला दुष्काळ किंवा तेजीची लाट म्हणतां येईल. अशी परिस्थिति १०–१२ वर्षांपेक्षा जास्त टिकूं शकत नाहीं. महाराष्ट्रांत खुद्द निसर्गाच्या कोपामुळेंच १३ व्या शतकांत पडलेला "दुर्गादेवीचा दुष्काळ", फक्त १२ वर्षेंच टिकून त्यापुढें अभूतपूर्व स्वस्ताई झाली. पहिल्या महायुद्धानंतरहि १९१७–१८ सालीं आलेली तेजीची लाट १९२९ पासून ओसरून १९३४–३५ सालीं कमालीची मंदी झाली. १९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू होऊन १९४१–४२ पासून सुरू झालेली तेजीची लाट आतां १९५२ पासून ओसरूं लागलेली आहे तिचीं सुचिन्हें आतां दिसूं लागलीं आहेत. व्यापारीवर्गास म्हणावें सावधान! जनतेस अभिवादन! परमेश्वर, निसर्ग तुमचे बाजूस आहे. परमेश्वर मंगलमय आहे. त्याचें स्वागत नम्रतेनें व भक्तिभावानेंच केलें पाहिजे.

(महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचें मुखपत्र, मार्च १९५२)

# BANK OF POONA LIMITED.

Balance Sheet as at 31st December, 1951.

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|
| **1. Capital:-** | | |
| Authorised Capital 50,000 Shares of Rs. 100/- each ... | 50,00,000—0—0 | |
| Issued Capital 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—0—0 | |
| Subscribed Capital 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—0—0 | |
| Amount Called up at Rs. 50/- per Share ... | 12,50,000—0—0 | |
| Less Calls unpaid ... | Nil | 12,50,000—0—0 |
| Add forfeited Shares ... | Nil | |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | | 12,000—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 9,03,750—0-9 | |
| Savings Bank Deposits ... | 7,71,874—0-8 | |
| Current Accounts, Contingency accounts etc., ... | 7,86,244—1-5 | 24,61,868—2-10 |
| **4. Borrowings From Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (1) In India ... | Nil | |
| (2) Outside India ... | Nil | Nil |
| Particulars (1) Secured ... | Nil | |
| (2) Unsecured ... | Nil | Nil |
| **5. Bills Payable:-** | | 1,667—9—9 |
| **6. Bills For Collection Being Bills Receivable As per Contra** | | |
| (1) Payable in India ... | 1,57,830-15-6 | |
| (2) Payable Outside India ... | Nil | 1,57,830-15—6 |
| **7. Other Liabilities** | | |
| (1) Provision of Income Tax ... | 1,559-13-0 | |
| (2) Branch adjustment ... | 2,274—8-3 | 3,834—5—3 |
| **8. Accept nces, Endorsements And Other Obligations:-** | | |
| As Per contra ... | | Nil |
| **9. Profit And Loss:-** | | |
| Profit as per last Balance sheet ... | 30,900—7-4 | |
| Less appropriations:- ... | | |
| To Reserve Fund ... 7,000—0—0 | | |
| To Provision for Income Tax ... 14,000—0—0 | | |
| To Preliminary Expenses ... 1,000—0—0 | | |
| To Brokerage ... 8,000—0—0 | 30,000—0-0 | |
| | 900—7-4 | |
| Add Profit for the year brought from the Profit and Loss Acoount | 18,58-13-1 | 19,469—4—5 |
| **10. Contingent Liabilities:-** | | |
| (1) Calls on partly paid shares ... Rs. 40/- | | |
| (2) The Bank is contingently liable for guarantee given ... 2,249-11—9 | | |
| | Total Rs. | 39,06,670—5—9 |

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|
| **1. Cash:-** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (Including foreign Currency Notes) ... | | 5,00,617-10—7 |
| **2. Balances With Other Banks :—** | | |
| (1) In India ... | 2,59,097-12-11 | |
| (2) Outside India ... | Nil | 2,59,097-12-11 |
| **3. Money At Call And Short Notice** | | Nil |
| **4. Investments (at book value)** | | |
| (1) Securities of the Central and state Governments and other trustee securities, including treasury bills of the Central and State Governments (Market value Rs. 5,46,255-0-0) ... | 5,88,602—4—0 | |
| (2) Shares Ordinary fully Paid ... | 5,781—4—0 | |
| ,, Partly paid ... | 90—4—6 | |
| Deferred fully paid ... | 1,545—0—0 | |
| (Market value: Rs. 5,729-0-6) | | |
| (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| (4) Other investments ... | Nil | |
| (5) Gold ... | Nil | 5,96,018-12—6 |
| (Some of the Investments are lodged with other Banks for advance facilities) | | |
| **5. Advances:-** (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors) ... | | |
| (1) Loans, Cash Credits, Overdrafts etc. | | |
| (i) In India 22,43,634-9-3 | | |
| (ii) Outside India Nil | 22,43,634—9-3 | |
| (2) Bills Discounted and Purchased (excluding treasury bills of the Central and State Governments) | | |
| (i) Payable in India 84 523-11-0 | | |
| (ii) Payable outside India Nil | 84.523-11—0 | 23,28,158—4—3 |

(See Profit and Loss Account on Page 147)

# BANK OF POONA LIMITED

Balance Sheet as at 31st December, 1951.

## PROPERTY AND ASSETS [ *continued* ]

| Particulars | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| **Particulars Of Advances:-** | | | |
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | | 17,98,018-15—8 | |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security. ... | | 5,06,737-15—7 | |
| (3) Debts considered good secured by the Personal liability of one or more parties, in addition to the personal security of the Debtors'. ... | | Nil | |
| (4) Debts considered doubtful or bad not provided for ... | | 23,401—5—0 | |
| | | 23,28,158—4—3 | |
| (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally, or jointly with any other person ... | | 1,80,051—3—0 | |
| (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, partners or managing Agents or, in the case of the private companies, as members ... | | 4,05,789—6-10 | |
| (7) Maximum total amount of advances, including temporary advances made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | | 1,87,015—4—0 | |
| (8) Maximum total amount of advances including temporary advances, granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies as members ... | | 4,48,786—7-10 | |
| (9) Due from Banking Companies ... | | Nil | |
| **6. Bills Receivable Being Bills For Collection** as per contra | | | |
| (1) Payable in India ... | | 1,57,830-15—6 | 1,57,830-15—6 |
| (2) „ outside India ... | | Nil | |
| **7. Constituents' Liabilities For Acceptances, Endorsements And Other Obligations per contra** ... | | Nil | |
| **8. Premises Less Depreciation:-** | | | |
| Amount received from Government on acquisition ... | | 23,000—0—0 | |
| Less value at cost ... | 20,000—0—0 | | |
| „ depreciation upto 31-1-50 ... | 1,500—0—0 | 18,500—0—0 | |
| | | 4,500—0—0 | Nil |
| Less written off to brokerage on sale of shares ... | | 4,500—0—0 | |
| **9. Furniture And Fixtures Less Depreciation:-** | | | |
| At cost as per last Balance Sheet ... | | 47,036-15—9 | |
| Additions during the year ... | | 419—7—0 | |
| | | 47,456—6—9 | |
| Less depreciation upto 31-12-51 ... | | 9,859—6—9 | 37,597—0—0 |
| **10. Other Assets, Including Silver** | | | |
| Stamps ... | | 388—4—0 | |
| Stationery ... | | 3,340—0—0 | |
| Vehicles ... | 11,262—0—0 | | |
| Less depreciation upto 31-12-51 ... | 2,260—0—0 | 9,002—0—0 | |
| Interest accrued on investments ... | | 5,675—5—0 | |
| Tax deducted at source ... | | 4,344—5—0 | |
| Tax paid in advance ... | | 4,600—0—0 | |
| Preliminary expenses as per last balance sheet ... | 7,000—0—0 | | |
| Less written off from profits of 1950 ... | 1,000—0—0 | | |
| | 6,000—0—0 | | |
| Less written off from investments fluctuation fund ... | 6,000—0—0 | Nil | |
| Brokerage on sale of shares balance as per last balance Sheet | 18,000—0—0 | | |
| Less written off from profits of 1950 ... | 8,000—0—0 | | |
| | 10,000—0—0 | | |
| Less written off from investment fluctuation fund ... | 5,500—0—0 | | |
| | 4,500—0—0 | | |
| Less written off from Profits of Premises account | 4,500—0—0 | Nil | 27,349-14—0 |
| **11. Non Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | | Nil |
| | | Total Rs. | 39,06,670—5—9 |

( See Profit and Loss Account on Page 147 )

# BANK OF POONA LIMITED

Profit and loss Account for the year ended 31 December, 1951.

**Dr** **EXPENDITURE**

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| Interest paid on deposits, borrowings etc., | ... | | 42,153-10-10 |
| Salaries and Allowances and Provident Fund. | ... | | |
| (1) Manager | ... | 6,860—0—0 | |
| (2) Staff | ... | 43,041—0—1 | 49,901—0—1 |
| Directors' and Local Committee members' fees and allowances | ... | | 2,700—0—0 |
| Rent, Taxes, Insurance, Lighting etc., | ... | | 9,155—4—9 |
| Law charges | ... | | 3,299-10—6 |
| Postages, Telegrams, and Stamps. | ... | | 3,82[illegible]-15-11 |
| Auditors' Fees | ... | | 1,000—0—0 |
| Depreciation on and repairs to the banking company's property | ... | | 4,240—7—0 |
| Stationery, Printing, Advertisement etc., | ... | | 11,617—2—9 |
| Loss from sale of or dealing with non-banking assets | ... | | Nil |
| Other Expenditure | ... | | 7,747-15—3 |
| Balance of Profit, ( Subject to taxation ) | ... | | 18,568-13—1 |
| | | Total Rs. | 1,54,207—0—2 |

**INCOME** (Less provision made during the year for bad & doubtful debts & other usual or necessary provisions) **Cr**

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| Interest and Discount | ... | | 1,39,747—7—11 |
| Commission, Exchange and Brokerage | ... | | 11,187-14—9 |
| Rents | ... | | 292—8—0 |
| Net profit on sale of investment, gold, and silver, land, premises and other assets. ( not credited to Reserves or any particular Fund or Account ) | ... | | Nil |
| Net profit on revaluation of investments gold and silver, land, premises and other assets ( not credited to Reserves or any particular Fund or Account ) | ... | | Nil |
| Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets. | ... | | Nil |
| Other receipts | ... | | 2,979—1—6 |
| | | Total Rs. | 1,54,207—0—2 |

M. C. Loya, { Chairman.

N. B. Parulekar,
F. P. Pocha,
D. R. Naik,
N. S. Somani,
G. K. Naik, } Directors.

K. D. Joglekar,
Accountant.

G. G. Sathe,
Manager.

*Note:*— Shri L. R. Rathi, being out of station has not signed the Balance sheet.

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of Bank of Poona Ltd., as at 31st December 1951, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the authenticated returns from branches and report that:—

(a) we have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory;
(b) the transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank;
(c) the returns received from the branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of the audit;
(d) in our opinion, the foregoing Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the law;
(e) No depreciation in the value of investments has been provided for;
(f) subject to what is stated in (e) such Profit and Loss Account shows a true balance of Profit for the year;
(g) subject to what is stated in (e) such balance sheet exhibits a true and correct view of the state of the affairs of the Bank according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank and
(h) in our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130, of the Indian Companies Act 1913.

Poona, 9th February, 1952.

S/d S. B. Billimoria & Co.
Chartered Accountants.

( See Balance Sheet on Page 14[illegible] )

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay



फोनः ३५५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना

असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई-शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.